# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 09/01/2021 (शनिवार)
(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर वडोदा रोडवर चतुर्वेदी फार्म हाउस येथे दिनांक 07/01/2021 चे 22.45 वा. दरम्यान नियंत्रण कक्ष नागपूर ग्रामीण यांनी दिलेल्या खबरेवरून फिर्यादी सर तर्फे पोहवा प्रशांत काळे हे पो. स्टे. स्टाफसह घटनास्थळावर गेले असता लहान मोठे गोवंश जनावरांना क्लेशदायक, कोणताही चारापाण्याची व्यवस्था न करता उपास मारीनेव्याकुळ होईल अश्या स्थितीत दोरीने निर्दयतेने त्यांना अज्ञात आरोपीने दावनिला बांधुन ठेवलेले एकुण 23 (गाई,गोरे,बैल) कि. 1,39,100/–रू. ही जनावरे ताब्यात घेवुन जप्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवा श्री. प्रशांत काळे, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम 11 (1),11(1)(एफ),11(1)(एच),11(1)(आय) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. जंगवाड 8329948101 हे करीत आहे.

### गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मौजा नवीन वस्ती खापा येथे दिनांक 08/01/2021 चे 12:00 वा. ते 14.30 वा. दरम्यान मिरा दिलीप तभाने, वय 54 वर्ष, रा. नवीन वस्ती खापा हिने डोके दुखण्याचे त्रासाला कंटाळुन तिने नायलॉन दोरीने गळफास घेतल्यानंतर ती मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिलीप बळीराम तभाने, वय 54 वर्ष, रा. नवीन वस्ती खापा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई गणेश भनगुरे 7507544536 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर